# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:17.05.2025** **वार:शनिवार**

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते संस्कृत पंडित जगद्गुरू रामभद्राचार्य आणि उर्दू कवी गुलझार यांना 2023 साठीचा ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान
2. ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर पाकिस्तानच्या खोट्या प्रचाराला उत्तर देण्यासाठी भारत विविध देशांत शिष्टमंडळ पाठवणार
3. पाकिस्तानला देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीचा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं पुनर्विचार करावा-संरक्षणमंत्री राजनाथसिंह
4. भारत गौरव रेल्वे अंतर्गत, छत्रपती शिवाजी महाराज विशेष-वारसा-सहलीची घोषणा; येत्या नऊ जूनपासून सुरुवात आणि
5. पुढचे चार दिवस राज्याच्या बहुतांश भागात पावसाचा अंदाज

**ज्ञानपीठ पुरस्कार**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल नवी दिल्ली इथे संस्कृत पंडित जगद्गुरू रामभद्राचार्य आणि उर्दू कवी गुलझार यांना 2023 साठीचा ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान केला. जगद्गुरू रामभद्राचार्य आणि ज्येष्ठ उर्दू कवी, गीतकार गुलजार, यांची, या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड झाली होती. गुलजार यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे ते पुरस्कार सोहळ्याला उपस्थित राहू शकले नाहीत.

साहित्य क्षेत्रातील त्यांच्या उत्कृष्ट योगदानाबद्दल त्यांना ज्ञानपीठ पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. जगद्गुरू रामभद्राचार्य यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन भावी पिढ्या साहित्य निर्मिती, समाजनिर्माण आणि राष्ट्रनिर्माणात योग्य मार्गावर पुढे जात राहतील असा विश्वास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यावेळी व्यक्त केला.

**सिंदूर मंडळ**

ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाल्यानंतर पाकिस्ताननं खोट्या बातम्यांच्या आधारे जगभरात भारताविरोधात, खोटा प्रचार करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. मात्र भारत आता मुत्सद्देगिरीच्या जोरावर या प्रचाराचा प्रतिकार करत आहे. या पार्श्वभूमीवर 22 मे पासून 8 खासदारांचे गट 5 विविध देशांना भेटी देणार आहेत. प्रत्येक गटात 5 ते 6 खासदार आणि परराष्ट्र मंत्रालयाचे अधिकारी असतील. या भेटीत ते स्थानिक प्रतिनिधींना पहलगाम हल्ला, पाकिस्तानचा खोटा प्रचार आणि ऑपरेशन सिंदूरमागचं सत्य याबद्दल माहिती देतील. पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादाबद्दल भारताची ठाम भूमिका जागतिक समुदायासमोर अधिक ठळकपणे मांडण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आलं आहे.

**राजनाथसिंह**

पाकिस्तानला देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीचा पुनर्विचार करण्याची विनंती भारतानं आंतरराष्ट्रीय नाणेनिधीला केली आहे. या निधीचा मोठा भाग पाकिस्तानमधील दहशतवादाशी संबंधित पायाभूत सुविधांना मदत करत असल्याबद्दलची शंका, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केली आहे. ते काल भूज इथल्या हवाई दलाच्या तळावर हवाई योद्ध्यांशी बोलत होते. ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारतीय हवाई दलाने केलेल्या निर्णायक कारवाईबद्दल सिंह यांनी हवाई दलाचं कौतुक केलं.

**तिरंगायात्रा**

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतीय संरक्षण दलाच्या या गौरवपूर्व कामगिरीच्या सन्मानार्थ भारतीय जनता पार्टीच्या वतीनं राज्यभरात तिरंगा यात्रा काढण्यात येत असून; या यात्रांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नागपूर जिल्ह्यातील कामठी शहरात महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत तिरंगा यात्रा काढण्यात आली. नाशिक, जळगाव, सोलापूर, जालना, सिंधुदुर्ग, आणि कणकवली शहरातही तिरंगा यात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं. बुलडाणा इथले माजी सैनिक सुभेदार दिवाकर फंदाट, यांनी ऑपरेशन सिंदूरबद्दल आपल्या भावना आकाशवाणीकडे व्यक्त केल्या. ते म्हणाले......

**ऑपरेशन सिंदूर लॉन्च केलेले आहे, सरकारने ते पण एकदम इतकं बरोबर आहे, की पाकिस्तान डायरेक्ट फेस टू फेस लढाई करू शकत नाही पाकिस्तान जे आहे त्यांचे आतंकी पाठवून ते जे हे लॉन्च पॅड महावलपुर, उरी POK चे जवळ जवळ भरपूर त्यांचे आतंकवादी यांचे कॅम्प चालतात आमची भारतीय सेना एवढी मजबूत आहे की आम्ही कोणत्याही परीस्थित त्यांना हरवू शकतो आमचा एक एक जवान त्यांना दहा दहा जवानांच्या भारी आहे. इतकं म्हणजे परफेक्ट काम अजून लढाई बंद झालेली नाहीये लढाई त्यांना ऑर्डर दिलेली आहे. की तुम्ही जर आतंकवादी कारवाई केली तर आम्ही युद्ध समजून तुमच्यावर कारवाई करू आणि हे सामान्य जनता देखी; आमच्या सोबत आहे आर्मी नेव्ही एअर फोर्स भारतीय फौज कधीही माघार घेणार नाही आणि पाकिस्तान जेव्हाही कारवाई करेल तेव्हा त्याला ते घुटना वरच येणार आहेत.**

**<u>शंभर दिवस</u>**

राज्यात 100 दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत घेतलेल्या स्पर्धेत, महामंडळांमधे झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणानं 100 पैकी 82 पूर्णांक 16 गुण मिळवून पहिला क्रमांक पटकावला आहे; महावितरणनं दुसरा तर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणानं तिसरा क्रमांक मिळवला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल हा निकाल जाहीर केला. 100 दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत वेबसाईट सुधारणा, कार्यालयीन सोईसुविधा, अशा विविध 10 मुद्यांवर सर्व शासकीय कार्यालयांमध्ये ही स्पर्धा घेण्यात आली.

**<u>विशेष रेल्वे</u>**

भारतीय रेल्वे खानपान आणि पर्यटन महामंडळ म्हणजेच IRCTC नं ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी तसंच छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचा अनुभव देण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज विशेष वारसा सहलीची घोषणा केली आहे. भारत गौरव टूरिस्ट ट्रेन उपक्रमा अंतर्गत येत्या 9 जून पासून ही विशेष रेल्वे सुरू होत आहे. या 5 दिवसांच्या उपक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारीत कार्यक्रम असणार आहेत. या सहलीद्वारे महाराष्ट्रातील विविध ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व असलेल्या ठिकाणांचा पर्यटकांनी अनुभव घ्यावा, असं आवाहन पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी केलं आहे.

**<u>साखर</u>**

देशातील साखर हंगाम संपला असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा उत्पादनात 18 टक्क्यांनी अर्थात 58 लाख टनांनी घट झाली आहे. यंदा 257 लाख टन साखरेचं उत्पादन झालं. गेल्यावर्षी हेच उत्पादन 315 लाख टन झालं होतं. सरासरी साखर उताऱ्यातही घट होऊन यंदा केवळ 9 पूर्णांक 30 टक्के साखर उतारा मिळाला आहे. यंदा उत्तरप्रदेशनं 92 लाख 80 हजार टन उत्पादन घेऊन महाराष्ट्राला मागे टाकत, अव्वल क्रमांक पटकावला . महाराष्ट्रात 80 लाख 95 हजार टन उत्पादन झालं आहे. ऊसाची घटलेली उपलब्धता आणि साखर उताऱ्यातील घट यामुळे प्रत्यक्ष साखर उत्पादन कमी झाल्याची माहिती राष्ट्रीय साखर महासंघानं दिली आहे. मात्र देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी पुरेसा साठा असल्याचं महासंघानं म्हटलं आहे.

**<u>सीडबॉल-पालघर</u>**

निसर्गाचं आपल्या जीवनातलं देणं आणि पर्यावरणाचं महत्व ओळखून, पालघर जिल्ह्यातल्या लिलकपाडा या जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक, दिपक देसले यांनी वृक्ष लागवडीचा विडा उचलला आहे. ऐकुयात अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**देसले आणि त्यांच्या शाळेतल्या मुलांनी आयुर्वेदात उपयोगात येणाऱ्या झाडांच्या बिया इतर ठिकाणांहून आणल्या. शाळेतल्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून माती, गांडुळ खत, विविध झाडांच्या बिया हे सर्व एकत्रित करून त्यापासून 45 हजार सीड बॉल तयार केले. देसले आणि शाळेतील मुलांनी तयार केलेल्या सीड बँकेत 30 ते 32 प्रकारच्या झाडांच्या बिया जमा झाल्या आहेत. धुळे, लातूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, अहिल्यानगर, रायगड, नवी मुंबई, अमरावती, अकोला, नांदेड, चंद्रपूर या शहरांत या बिया पाठवल्या गेल्या आहेत. ज्यामध्यातून या विविध भागातले शिक्षक आणि विद्यार्थी या पर्यावरणपुरक उपक्रमात जोडले गेले. हे सीड बॉल्स जून, जुलै महिन्यात डोंगरावर आणि इतर काही ठिकाणी टाकण्यात येणार आहेत. ज्यामुळे पावसाळ्यात नवी झाडं तयार होतील. पर्यावरण संवर्धनासाठी केलेला हा उपक्रम नक्कीच प्रेरणादायी ठरू शकेल.आकाशवाणी बतम्यांसाठी पालघरहून नीतु चौरे.**

**तेंदूपत्ता मजूर-गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्याच्या कोरची तालुक्यात, तेंदूची पानं गोळा करणाऱ्या एका मूकबधीर मजुराचा सर्पदंशानं नुकताच मृत्यु झाला. अशा मजुरांसाठी असा धोका नेहमीच असतो; त्यावर संरक्षणाच्या सूक्ष्म आणि कायमस्वरुपी व्यवस्थेची गरज आहे... एक वृत्तांत...

**बोलता येत नसल्यानं तो मजूर सर्पदंशाबद्दल आरडाओरडा करुन कोणाला सांगू शकला नाही, घरी आल्यानंतर खाणाखुणांद्वारे घटना कळली, घरच्या लोकांनी त्याला रुग्णालयात दाखल केलं, परंतु तो वाचू शकला नाही. मे महिन्यात मजुरांचे जत्थे तेंदूपानं तोडण्यासाठी गडचिरोलीच्या जंगलांकडे रवाना होतात. तेंदुपत्त्याच्या शंभर पुड्यांमागे 1 हजार रुपये मिळत असल्यानं महिला, पुरुष आणि तरुण मुलंही हे काम करतात. पानं तोडण्यासाठी जंगलात भटकंती करताना जंगली श्वापदं आणि सरपटणाऱ्या प्राण्यांसोबत त्यांचा सामना होतो. मागील आठ-दहा दिवसांत कोरची तालुक्यात अशा अनेक घटना घडल्या आहेत. वाघ, बिबट्या, हत्ती, अस्वल, रानडुक्कर इत्यादी 10 प्राण्यांनी हल्ला केला तर जखमी किंवा मृत मजुराला अर्थसहाय्य मिळण्याची तरतूद आहे. मात्र, सर्पदंशानं मृत्यू झाल्यास मदतीची तरतूद नाही. वार्षिक तेंदुपत्ता हंगामात मजुरांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगानं अशा बारीक-सारीक गोष्टींचा विचार काळानुरुप आवश्यक आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी गडचिरोलीहून जयंत निमगडे यांच्यासह मनोज क्षीरसागर, पुणे.**

**हवामान**

राज्याच्या सर्व विभागांमध्ये तुरळक ठिकाणी काल हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला. पुढील आठवडाभर राज्यात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा, विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.